**<u>अत्यंत तातडीचे</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुके/१/कावि/ ९९९ /२०१७
दि. ०३ /०६/२०१७

**विषय – शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ ची अंमलबजावणी होण्यासाठी पुरविण्यात येणा-या सेवा/सुविधांसाठी करावे लागणारे अर्जांचे नमुने एकत्रीत करुन त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत....**

**संदर्भ – महाराष्ट्र शासन क्र. संकिर्ण-२०१७/सं.क्र./९१९/नवि २० नगरविकास विभाग, दि. २९/०५/२०१७**

परिपत्रक,

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ ची अंमलबजावणी होण्यासाठी पुरविण्यात येणा-या सेवा/सुविंधांसाठी करावे लागणारे अर्जांचे नमुने एकत्रीत करुन त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी कळविले आहे. सोबत संबंधित पत्राची छायांकित प्रत जोडली आहे.

सबब सदर पत्रास अनुसरुन आपले कार्यालयाकडून पुरविणेत येणा-या सेवा/सुविधांसाठी नागरीकांना करावे लागणारे अर्जांचे नमुने एकत्रीत करुन त्यामध्ये सुधारीत अर्जाचे नमुने तयार करताना सुचविलेल्या निर्देशानुसार सुधारणा करुन कोणत्याही परिस्थितीत दि.०७/०६/२०१७ पर्यंत युनिकोड फॉन्ट मध्ये सॉफ्ट कॉपी ई-मेल व्दारे व हार्ड कॉपी नागरी सुविधा केंद्र विभागाकडे आपले खास दूता मार्फत सादर करावेत.

तसेच, अर्जांचे नमुने महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येऊन ऑनलाईन डाऊनलोड ची सुविधा देखील उपलब्ध करणेत येणार आहे. त्यासाठी अर्जांचे नमुने मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये नागरीकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

सदरची माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास कोणतेही स्मरणपत्र न देता संबंधित विभागप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करणेत येईल.

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११०१८**

सोबत :- संदर्भिय पत्राची छायांकित प्रत

प्रति,

सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख,
----------------------- विभाग.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण-२०१७/सं.क्र.११९ /नवि २०
नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
ई-मेल- uday.sardal@nic.in
दिनांक :-२९ मे, २०१७.

प्रति,

आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय:- शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी होण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या सेवा / सुविधांसाठी करावे लागणारे अर्जाचे नमुने एकत्रित करुन त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत.

महोदय,

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी होण्यासाठी "प्रकरणांचा निपटारा" याचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (प्र.सु. व र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०३.२०१७ रोजी पार पडलेल्या बैठकीत विभागाच्या विविध कार्यालयामध्ये / आस्थापनाकडे विविध सेवा / सुविधांसाठी करावे लागणारे अर्जाचे नमूने एकत्रित करुन त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत निदेश पाप्त झाले आहेत. सदर निदेशास अनुसरुन आपल्या कार्यालयाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवा /सुविधांसाठी करावे लागणारे अर्जाचे नमुने एकत्रित करुन सुधारित अर्जांचे नमुने तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करुन ते कोणत्याही परिस्थितीत दि. १०.०६.२०१७ पर्यंत शासनास सादर करण्याची विनंती आहे:-

१) नमुने तयार करताना प्रथमत: पहिल्या भागात सर्वसाधारण माहिती म्हणजे अर्जदाराचे नाव, आधार कार्ड नं., पँन कार्ड नं., इ. माहिती अंतर्भुत असावी.

२) दुसऱ्या भागात विशिष्ट सेवांसाठीची माहिती घ्यावी तथापी ती कमीत कमी असावी व क्लिष्ट नसावी.

३) नमुन्यातील अनावश्यक मजकूर कमी करण्यात यावा.

४) १ पृष्ठ असलेले नमुने असतील तर नमुन्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करावा. अनेक सेवांसाठी एकच नमुना वापरता येईल, यासाठी विविध सेवांसाठी एक पृष्ठाचा नमुना तयार करावा.

आपला,

(उदय ना. सार्दळ)
कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग

C:\UD२० २०१७\Letter\May\Letter.docx